# आम्ही स्वभाव नव्हे; तर जीवनही बदलतो -डॉ.अनिता

मुंबई/जॉन मेढे

स्वभावाला औषध नसतं अशी म्हण आपल्याकडे रूढ आहे, परंतु आम्ही रुग्णाच्या स्वभावात बदल घडवू शकतो, नव्हे आम्ही तो स्वभावच बदलतो. रोगाच्या मुळाशी जाऊन त्या रोगाच निदान करून रुग्णांना व्याधीमुक्त करतो. हे करत असतानाच रुग्णाच्या अंतरंगात डोकावत त्यांचे जीवन फुलवतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून त्याला 'हिलींग' टच देत रुग्णाच्या आयुष्यात सुखाचे रंग भरतो. असा दावा चेंबूरमधील होमिओपॅथी डॉक्टर डॉ. अनिता साळुंखे यांनी केला आहे. होमिओपॅथी आणि मानसिक संतुलन या विषयावर प्रबंध लिहिणाऱ्या डॉ. अनिता साळुंखे ह्या एम.डी. देखील आहेत.

कळत्या वयापासून समाजसेवा वैद्यकीय पेशाची आवड असलेल्या डॉ. अनिता साळुंखे या गेल्या वीस वर्षापासून या कार्यक्षेत्रात असून त्यांच्या प्रॅक्टीसला अध्यायाचीही किनार आहे. होमिओपॅथीबद्दल आपल्याकडे बरेच समज, गैरसमज आणि अपसमज आहेत. म्हणजे साबुदाण्याच्या आकाराच्या गोळ्या. जर्जर व्याधींनी त्रस्त असलेले व्याधीला कंटाळलेले रुग्णअखेर होमिओपॅथीचा मार्ग पत्करतात. शिवाय रोगमुक्ती मिळेल की नाही, डॉक्टरांची फी, अशा प्रश्नांनी ग्रासलेले रुग्ण निराशाजनक भाव चेहऱ्यावर घेऊन इथे येतात. परंतु पहिल्याच भेटीत त्यांचे गैरसमज दूर करून त्यांच्यात सकारात्मकता निर्माण करून निदानाला त्या सुरूवात करतात. खरे तर माणसाचं मन प्रसन्न व शांत असेल आणि त्याची मानसिकता जर ठीक असेल तर त्याला कुठलाही आजार लवकर जडत नाही. सर्व रोगाचं मूळ रुग्णाच्या मानसिकतेत आणि न्यूनगंड निर्माण झालेल्या मनात दडलेलं असतं. त्यामुळे केवळ रोगनिदान व रोगोपचार करून चालत नाही तर रुग्णाची मानसिक स्थितीही पाहणं गरजेचं आहे. आणि मी म्हणून प्रथम रुग्णाची मन व मानसिकता अभ्यासून त्या उपचाराला सुरूवात करतात.

१९८९पासून होमिओपॅथी प्रॅक्टीस करणाऱ्या डॉ. अनिता साळुंखे सांगतात की, वैद्यक विश्वाची ही शाखा आपल्याकडे फारशी विकसित नाही. त्याला कारण इथली व्यवस्था याविषयी असणारे गैरसमज. पण होमिओपॅथीच्या मुळाशी जाऊन ती समजावून घेण्याचा प्रयत्न करत नाही. उलट लोकांना ॲलोपॅथी बरी वाटते. कारण ती तात्पुरता तरी आराम देते. खरे तर ॲलोपॅथीमध्ये डिलीट व कंट्रोल हे तंत्र अवलंबलं जातं. पण रोगाचं निदान न होता आजचं मरण उद्यावर ढकललं जातं. आणि मग रोग बळावत जातो. परंतु होमिओपॅथी उपचार पध्दतीत रोगाच्या मुळाशी जाऊन उपचार केले जातात आणि रुग्ण व्याधी मुक्त पूर्ण बरे होतात. असा त्यांचा दावा आहे. एएफएसी या संस्थेव्दारे त्यांनी जर्मनी, अमेरिका, राहिया, बल्गेरिया, इस्त्राएल आणि दोघांमध्ये जाऊन तिथल्या वैद्यकीय तज्ज्ञांना होमिओपॅथीचे धडे दिलेले आहेत. परदेशातून आल्यानंतर त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन होमिओपॅथीची अखिल भारतीय कार्यशाळा सुरू केली आहे. त्यासंस्थेव्दारे सध्या त्यांचे रुग्णोपचारातून समाजसेवेचं देखील कार्य सुरू आहे. त्याशिवाय स्वतःच वेब विश्व उभारून ई मेलवरतीही त्या रुग्णावर उपचार करतात.

होमिओपॅथीव्दारे व्यंग नाहीसे करता येते. शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे या पध्दतीव्दारे तुमचा चेहरा देखील बदलता येतो. तुम्हाला गोंडस रुपं मिळू शकते असा दावा करणाऱ्या डॉ. अनिता साळुंखे यांना १९९६ साली इंडियन इन्स्टिट्युच ऑफ होमिओपॅथी फिजीशियन संस्थेने बेस्ट केस ॲवार्ड देऊन सन्मानित केले आहे. तर एएफएसी सेंटरने बेस्ट फॅकल्टी देऊन गौरविले आहे. परदेशात जाऊन चर्चा सत्रात जाऊन व्याख्यान देणाऱ्या त्या पहिल्या महिला होमिओपॅथी डॉक्टर आहेत. समुपदेशन व मानसिक तणावमुक्तीव्दारे रोगनिदान हा त्यांच्या कार्यपध्दतीचा मूलमंत्र आहे. त्यामुळेच रुग्णाची वृत्तीच बदलणे, स्वभावात बदल होणे आणि रुग्णांमध्ये जीवनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे या संदर्भात त्यांचे विशेष अभ्यासपूर्व व अनुभवासिध्द संशोधन आहे. अर्थात अध्यात्माची आवड असलेल्या डॉ. अनिता साळुंखे यांच्या कार्याला अध्यात्माची देखील झालर आहे.